# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
## Savitribai Phule Pune University
*(Formerly University of Pune)*

**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
दूरध्वनी क. (०२०) २५६२ १३९८
Website: www.unipune.ac.in

**Board of Examinations & Evaluation**
Ganeshkhind, Pune – 411 007
Telephone: (020) 2562 1398
E-mail: coe@unipune.ac.in


**संदर्भ क्र.:** परीक्षा/छावता/३२३५ **दिनांक :** ०१/१०/२०२६

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
प्रस्तुत विद्यापीठ
(पुणे, अहिल्यानगर, नाशिक जिल्हा व दादरा-नगर हवेली)

**विषय : सन २०२६ च्या खरीप हंगामातील Trigger-1 (प्रथम कळ) लागू झालेल्या २६५ तालुक्यातील दुष्काळ जाहीर करुन विविध उपाययोजना व सवलती लागू करणेबाबत.....**

संदर्भ : १. मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. समिती–२०२६/प्र.क्र.८२/मदत–२, दिनांक २५ सप्टेंबर, २०२६
२. मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक : उशिसं/शिष्य–२०२६–अवर्षण–परीक्षा शुल्क–२०२६–२७/ई१३२१७१६, दिनांक ३० सप्टेंबर, २०२६

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय आणि संदर्भीय शासन निर्णय व पत्रान्वये प्राप्त आदेशास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, विषयांकित बाबींसंदर्भातील मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक समिती–२०२६/प्र.क्र.८२/मदत–२, दिनांक २५ सप्टेंबर, २०२६ आणि मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक उशिसं/शिष्य–२०२६–अवर्षण–परीक्षा शुल्क–२०२६–२७/ई१३२१७१६, दिनांक ३० सप्टेंबर, २०२६ सोबत अवलोकनार्थ जोडले आहे.

सबब, संदर्भीय शासन निर्णय व पत्राचे अवलोकन करुन त्यामध्ये नमूद निर्देशांनुसार परीक्षा शुल्काबाबतची आवश्यक ती कार्यवाही व्हावी तसेच त्यासंदर्भात आवश्यक त्या उपाययोजना व्हाव्यात आणि कोणत्याही परिस्थितीत संबंधित दुष्काळग्रस्त तालुक्यातील पात्र विद्यार्थी हे सदरहू योजनेपासून वंचित राहणार नाहीत, याची सर्वोतपरी दक्षता घेण्यात यावी. तसेच सदरबाबतची माहिती आवश्यक त्या कागदपत्रांसह **examinward.unipune.ac.in** या लिंकवरुन दिनांक २५ ऑक्टोबर, २०२६ पर्यत काळजीपूर्वक भरुन प्राधान्याने सादर करण्यात यावी.

कळावे,

Director Board of Examination & Evaluation, Savitribai Phule Pune University, Pune-7.

आपला,

(डॉ. राजेंद्र तलवारे)
**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**सोबत :** वरीलप्रमाणे.

**सन २०२६ च्या खरीप हंगामातील Trigger-१ (प्रथम कळ) लागू झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करुन विविध उपाययोजना व सवलती लागू करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**मदत व पुनर्वसन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक:- समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२
दिनांक:- २५ सप्टेंबर, २०२६

**वाचा:-** १) शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण-२०१७/प्र.क्र.१७३/२०१७/३ दि.०७ ऑक्टोबर, २०१०
२) शासन निर्णय, क्रमांकः संकिर्ण-२०१७/प्र.क्र.१७३/२०१७/म-७, दि. २८ जून, २०१८
३) शासन पत्र क्रमांकः एससी वाय-२०२१/प्र.क्र.१००/म-७, दि. १८ ऑक्टोबर, २०२१
४) शासन निर्णय क्रमांक: एससीवाय-२०२३/प्र.क्र.३७/म-७, दि. ३१ ऑक्टोबर, २०२३
५) कृषी आयुक्त यांचा अहवाल दि. २४ सप्टेंबर २०२६

**प्रस्तावना:**

दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ नुसार राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन करण्याबाबत संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक १ व २ अन्वये सविस्तर कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. खरीप २०२६ च्या हंगामातील परिस्थितीच्या आधारे राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती असल्याचे Trigger-१ (प्रथम कळ) संदर्भात आयुक्त कृषी यांच्या अहवाला वरून दिसून येते. सदरहू Trigger-१ (प्रथम कळ) नुसार दुष्काळी तालुके घोषित करणे व त्यामध्ये करावयाच्या विविध उपाययोजना व सवलती लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राज्यातील तालुक्यांमध्ये जून ते आज पर्यंत या कालावधीतील पर्जन्याची तूट व अन्य घटकांनी प्रभावित झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती असल्याचे आयुक्त, कृषी यांच्या अहवालावरून दिसून येते. सदर २६५ तालुक्यांमध्ये Trigger-१ (प्रथम कळ) लागू असल्यामुळे तिथे पंचनामे करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी तात्काळ सुरु करावी. सर्व्हेक्षण केलेल्या क्षेत्रातील पिकांची स्थिती दर्शवणारे छायाचित्र व जीपीएस कोऑडीनेट संकलन करून पिक परिस्थितीचा अहवाल आयुक्त,कृषी यांच्या मार्फत शासनास तात्काळ सादर करण्यात यावा.

२. राज्यातील दुष्काळग्रस्त Trigger-१ (पहिली कळ) २६५ तालुक्यांत लागू असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे परिशिष्ट-१ मध्ये नमूद एकूण २६५ तालुक्यांतील दुष्काळग्रस्त भागासाठी राज्य शासनाकडून विशेष बाब म्हणून खालील उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

१) जमीन महसूलात सूट

२) पिक कर्जाचे पुनर्गठन

३) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती

४) कृषी पंपाच्या चालू विजबिलात सूट *(७.५ हॉर्सपावर पर्यंत क्षमतेच्या विजपंपाचे वीज बिल अगोदरच माफ करण्यात आले आहे. त्यावरील वीज पंपांना सदर सूट लागू असेल)*

५) शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी

६) रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात शिथिलता आणून जास्तीत जास्त कामे सुरु करणे

७) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर

८) टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतक-यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे

९) शेतीवर आश्रित शेतकरी/मजूर इत्यादी यांना अन्न धान्याची टंचाई होणार नाही याबाबत व्यवस्था उभी करणे

१०) जनावरांना आवश्यक चारा उपलब्ध होईल याची व्यवस्था करणे

११) जलसंधारणाची कामे सुरु करणे

१२) अगोदरच निर्गमित करण्यात आलेले शासन निर्देशाप्रमाणे पिण्याचे पाणी आणि जनावरांसाठी पाण्याचे नियोजन करणे

३. सदर २६५ तालुक्यांमधील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शेत पिकांच्या नुकसानीबाबतची मदत विहीत कार्यपध्दतीची पूर्तता करुन स्वतंत्र शासन निर्णयान्वये जाहीर केली जाईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०९२६१११७४९४९४१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by SANJAY SHANKARRAO INGLE
Date: 2026.09.26 11:21:13 +05'30'

**(संजय इंगळे)**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, मलबार हिल. मुंबई

२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

३) मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) सर्व मा. लोकसभा सदस्य/राज्यसभा सदस्य (महाराष्ट्रातील)
६) सर्व मा. विधानसभा सदस्य/विधान परिषद सदस्य
७) सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
८) मा. मुख्य सचिव यांचे सहसचिव, मंत्रालय, मुबई
९) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) अपर मुख्य सचिव (कृषी), कृषी, मंत्रालय, मुंबई
११) अप्पर मुख्य सचिव (महसुल), महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) अपर मुख्य सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुबई
१३) अपर मुख्य सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१५) प्रधान सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता), पाणी पुरवठा विभाग, जी. टी हॉस्पीटल, मुंबई
१६) प्रधान सचिव (मृदु व जलसंधारण), मृदु व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुबई
१७) प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१८) प्रधान सचिव (ऊर्जा), , ऊर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई
१९) आयुक्त (कृषि), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२०) महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
२१) महालेखापाल १/२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
२२) सर्व विभागीय आयुक्त
२३) सर्व जिल्हाधिकारी
२४) सर्व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी
२५) वित्त विभाग (व्यय-९/ अर्थसंकल्प/अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई.
२६) सर्व सहसचिव/उपसचिव, कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई
२७) सह सचिव तथा वित्तिय सल्लागार, मदत व पुनर्वसन, नवीन प्रशासन इमारत, मंत्रालय, म
२८) महसूल व वन विभाग, कार्यासन क्रमांक मदत-१/मदत-३
२९) निवडनस्ती (कार्यासन मदत-२)

**शासन निर्णय, क्रमांक:- समिती-2026/प्र.क्र.82/मदत-2**

**परिशिष्ट-1**

**खरीप हंगाम-2026 -प्रथम कळ (Trigger-1) लागु झालेल्या तालुक्यांची माहीती**

| महसूल विभाग | अ.क्र. | जिल्हा | प्रथम कळ (Trigger-1) लागू झालेले तालुके | |
|---|---|---|---|---|
| | | | तालुक्यांची नावे | तालुक्यांची संख्या |
| **ठाणे** | 1 | ठाणे | निरंक | 0 |
| | 2 | पालघर | निरंक | 0 |
| | 3 | रायगड | श्रीवर्धन | 1 |
| | 4 | रत्नागिरी | रत्नागिरी,संगमेश्वर, राजापूर | 3 |
| | 5 | सिंधुदुर्ग | सावंतवाडी, दोडामार्ग, कणकवली , कुडाळ, वैभववाडी, मालवण, देवगड, वेंगुर्ला | 8 |
| **नाशिक** | 6 | नाशिक | मालेगाव, बागलाण, कळवण, नांदगाव, सुरगणा, इगतपुरी, पेठ, सिन्नर, येवला, देवळा | 10 |
| | 7 | धुळे | धुळे, साक्री, सिंदखेडा, शिरपूर | 4 |
| | 8 | जळगांव | एरंडोल , पारोळा, धरणगाव ,चोपडा ,पाचोरा , जामनेर, जळगाव ,भडगाव , अमळनेर ,रावेर, चाळीसगाव,भुसावळ, बोदवड, मुक्ताईनगर , यावल, | 15 |
| | 9 | नंदुरबार | अक्कलकुवा, शहादा, नंदूरबार, नवापुर, तळोदा, अक्राणी | 6 |
| | 10 | अहिल्यानगर | नगर, पारनेर, श्रीगोंदा, कर्जत, जामखेड, शेवगाव, पाथर्डी, नेवासा, राहुरी, संगमनेर, अकोले, कोपरगाव, श्रीरामपुर, रहाता | 14 |
| **पुणे** | 11 | पुणे | भोर, वेल्हा, खेड , शिरूर , बारामती, इंदापूर , दौंड,पुरंदर, | 8 |
| | 12 | सोलापूर | उ. सोलापूर, द. सोलापूर , बार्शी, अक्कलकोट, मोहोळ, माढा, करमाळा पंढरपूर, सांगोला, माळशिरस, मंगळवेढा, | 11 |
| | 13 | सांगली | मिरज, आटपाडी, जत, कवठेमहाकाळ, | 4 |
| | 14 | सातारा | सातारा,खटाव, माण, फलटण, खंडाळा महाबळेश्वर | 6 |

**शासन निर्णय, क्रमांक:- समिती-2026/प्र.क्र.82/मदत-2**

**परिशिष्ट-1**

**खरीप हंगाम-2026 -प्रथम कळ (Trigger-1) लागु झालेल्या तालुक्यांची माहीती**

| महसूल विभाग | अ.क्र. | जिल्हा | प्रथम कळ (Trigger-1) लागू झालेले तालुके | |
|---|---|---|---|---|
| | | | तालुक्यांची नावे | तालुक्यांची संख्या |
| | 15 | कोल्हापूर | पन्हाळा, राधानगरी, गगनबावडा, भुदरगड,आजरा, चंदगड, | 6 |
| छ. संभाजीनगर | 16 | छ. संभाजीनगर | छ. संभाजीनगर, कन्नड, सोयगाव, पैठण, वैजापूर,गंगापूर खुलताबाद, सिल्लोड,फुलंब्री | 9 |
| | 17 | जालना | बदनापूर ,घनसावंगी अंबड , जालना परतूर,मंठा , भोकरदन, जाफ्राबाद | 8 |
| | 18 | बीड | बीड ,गेवराई, माजलगाव, केज, आंबेजोगाई, परळी, आष्टी, पाटोदा, शिरूर कासार, धारूर, वडवणी, | 11 |
| | 19 | लातूर | लातूर, औसा, अहमदपूर, निलंगा, उदगीर, चाकूर, रेणापूर, शिरुरअनंतपाळ, देवणी, जळकोट | 10 |
| | 20 | धाराशिव | धाराशिव, कळंब, भूम, वाशी, तुळजापूर,लोहारा,परांडा ,उमरगा | 8 |
| | 21 | नांदेड | नांदेड, बिलोली, कंधार, लोहा, हदगाव, भोकर, देगलुर, किनवट, हिमायतनगर, माहुर, धर्माबाद, उमरी, अर्धापुर, नायगाव | 14 |
| | 22 | परभणी | पूर्णा, पालम, परभणी, सोनपेठ जिंतूर, गंगाखेड, सेलू, मानवत, पाथरी | 9 |
| | 23 | हिंगोली | हिंगोली, औंढा नागनाथ, कळमनुरी, सेनगाव , वसमत | 5 |
| अमरावती | 24 | बुलढाणा | जळगावजामोद, संग्रामपुर, चिखली, देऊळगावराजा, मेहकर, बुलडाणा, शिंदेखेडराजा, लोणार, खामगाव, शेगाव, मलकापुर, मोताळा, नांदुरा | 13 |
| | 25 | अमरावती | अमरावती, भातुकली, चांदूर रेल्वे, नांदगाव खं., धामणगाव रेल्वे, अचलपूर, अंजनगावसुर्जी, तिवसा, धारणी, चिखलदरा, वरुड, मोर्शी, चांदुरबाजार, दर्यापुर | 14 |
| | 26 | अकोला | अकोट, अकोला, पातूर, तेल्हारा, मुर्तीजापूर, बाळापूर बार्शीटाकळी | 7 |

**शासन निर्णय, क्रमांक:- समिती-2026/प्र.क्र.82/मदत-2**

**परिशिष्ट-1**

**खरीप हंगाम-2026 -प्रथम कळ (Trigger-1) लागु झालेल्या तालुक्यांची माहीती**

| महसूल विभाग | अ.क्र. | जिल्हा | प्रथम कळ (Trigger-1) लागू झालेले तालुके | |
|---|---|---|---|---|
| | | | तालुक्यांची नावे | तालुक्यांची संख्या |
| | 27 | वाशिम | वाशीम, रिसोड, मालेगाव, मंगळूरपीर ,कारंजा ,मानोरा | 6 |
| | 28 | यवतमाळ | यवतमाळ, बाभुळगाव, कळंब, दारव्हा, दिग्रस, आर्णी, नेर, पुसद, उमरखेड, महागाव,वणी, मारेगाव, झरी -जामणी, केळापुर, घाटंजी, राळेगाव | 16 |
| नागपुर | 29 | वर्धा | वर्धा, सेलू, देवळी, आर्वी, समुद्रपूर, हिंगणघाट, आष्टी | 7 |
| | 30 | नागपूर | नागपूर, कामठी, सावनेर, पारशिवनी, मौदा, भिवापूर, कळमेश्वर, काटोल, रामटेक, हिंगणा,उमरेड, कुही, नरखेड, नागपूर शहर | 14 |
| | 31 | भंडारा | भंडारा, पवनी, लाखंदूर | 3 |
| | 32 | गोंदिया | तिरोडा | 1 |
| | 33 | चंद्रपूर | चंद्रपूर, भद्रावती, गोंडपिंपरी , राजूरा कोरपना, मूल, वरोरा, सावली, चिमूर, नागभिड, सिंदेवाही, पोंभुर्णा | 12 |
| | 34 | गडचिरोली | गडचिरोली, चार्मोर्शी | 2 |
| | **एकूण तालुके** | | | **265** |

Digitally signed by SANJAY SHANKARRAO INGLE
Date: 2026.09.26 11:21:30 +05'30'

**( संजय इंगळे )**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

महाराष्ट्र शासन


उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

४१२ ई, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे -४११०१६

फोन नं. ०२०-२६१२२११९ Web: www.dhepune.gov.in Email : director.dhepune@nic.in


क्र.उशिंस / शिष्य-२०२६- अवर्षण-परीक्षा शुल्क- २०२६-२७/ई १३२१७१६ दिनांक ३० सप्टेंबर २०२६

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग.

२. कुलसचिव, सर्व सार्वजनिक विद्यापीठे.

**विषय- सन २०२६ च्या खरीप हंगामातील Triger-१ (प्रथम कळ) लागू झालेल्या २६५ तालुक्यातील दुष्काळ जाहीर करुन विविध उपाययोजना व सवलती लागू करणेबाबत**

संदर्भ- १. शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. एफईडी - १५९२/१२०२/(११३२)/साशि-५, दि. १८.१०.१९९३

२. मदत व पुनर्वसन विभाग शासन निर्णय क्र.समिती २६/प्र.क्र.८२ /मदत/ २, दि.२५.०९.२०२६.

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये, राज्यातील टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची विद्यापीठ परीक्षा व परीक्षामंडळे यांची परीक्षा फी माफ करण्याची योजना लागू केली आहे. यामध्ये सार्वजनिक विद्यापीठाकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षांचा समावेश आहे.

आता संदर्भिय शासन निर्णय क्रमांक २ नुसार, सन २०२६ च्या खरीप हंगामातील Triger-१(प्रथम कळ) लागू झालेल्या २६५ तालुक्यातील दुष्काळ जाहीर करुन विविध उपाययोजना व सवलती लागू करण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णयामध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थितीवर उपाययोजना करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याची सवलत लागू केली आहे.

त्यानुसार आपल्या अधिनस्त संबंधीत दुष्काळसदृश्य तालूक्यातील महाविद्यालयांना खालील प्रमाणे सुचना देण्यात याव्यात.

१.संदर्भ क्रमांक १ येथील १८ ऑक्टोंबर, १९९३ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ८ मध्ये नमुद केल्याप्रमाणे दुष्काळ सदृश्य तालुक्यातील सवलतीस पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांन कडून महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी परीक्षा फी न घेता त्यांचे आवेदन पत्रे विद्यापीठाकडे संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयात नमुद केलेल्या प्रमाणपत्रावर सांक्षाकित करुन पाठवावे.

२. सन २०२६-२७ च्या दुष्काळसदृश्य तालूक्यातील पात्र विद्यार्थी शिक्षण घेत असल्यास सदर लाभार्थ्यांना परीक्षा शुल्कापोटी भरलेल्या रक्कमेची प्रतिपुर्ती करण्यासाठी त्यांचेकडून आलेल्या आवेदन पत्रावरुन प्रतिपुर्तीची रक्कम परिगणना करुन संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाकडे आवश्यक रक्कमेची मागणी करावी.

३. तसेच विद्यापीठाने आपल्याकडे प्राप्त झालेल्या सन २०२६-२७ च्या दुष्काळसदृश्य तालूक्यातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी प्रतिपुर्ती करण्यासाठी महाविद्यालयनिहाय आलेल्या आवेदन पत्रावरून प्रतिपुर्तीची रक्कम परिगणना करुन विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाकडे आवश्यक रक्कमेची मागणी करावी .

४. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी महाविद्यालयांकडून / विद्यापीठांकडून आलेल्या माहितीची तपासणी करुन आवश्यक रक्कमेची माहिती संचालनालयाकडे सोबतच्या विवरणपत्र अ मध्ये सादर करावी. सदरची माहिती सादर केल्यानंतर संचालक स्तरावरुन सहसंचालक कार्यालयांना सदर योजनेसाठी रक्कम उपलब्ध करुन देण्यात येईल व सहसंचालक स्तरावरुन संबंधित रक्कमेची प्रतिपुर्ती करण्यात येईल.

५. कोणत्याही परिस्थितीत दुष्काळ सदृश्य तालुक्यातील पात्र विद्यार्थी सदर योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे -१६

प्रत,-मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -३२

## विवरणपत्र – अ

सन २०२६-२७ च्या दुष्काळसदृश्य तालूक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत तपशिलाचे विवरणपत्र.

(रक्कम रुपयात)

| अ.क्र. | सन २०२६-२७ च्या दुष्काळसदृश्य तालूक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी फी भरलेली आहे अशा विद्यार्थ्यांची संख्या | ज्या विद्यार्थ्यांनी फी भरली आहे अशा विद्यार्थ्यांच्या परिक्षा फी प्रतिपुर्ती साठी आवश्यक रक्कम | सन २०२६-२७ च्या दुष्काळसदृश्य तालूक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी फी न भरता प्रमाणपत्र दिले आहेत अशा विद्यार्थ्यांची संख्या | ज्या विद्यार्थ्यांनी प्रमाणपत्र दाखल केले आहे अशा विद्यार्थ्यांच्या परिक्षा फी प्रतिपुर्ती साठी आवश्यक रक्कम | एकूण विद्यार्थी संख्या | एकूण प्रतिपुर्तीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

स्वाक्षरी

<u>प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, सोबत जोडलेल्या यादीतील विद्यार्थी हे दुष्काळ घोषित केलेल्या तालुक्यातील रहिवाशी आहेत. तसेच त्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये रु. ८.०० लक्ष मर्यादेपर्यंत आहे. त्यामुळे ते परीक्षा शुल्क माफी साठी पात्र आहेत. विद्यार्थ्यांनी शासनाच्या अन्य शैक्षणिक सवलतीनुसार १००% परीक्षा शुल्क माफी सवलतीसाठी अर्ज भरलेला नाही, याची खात्री केलेली आहे.

तरी दुष्काळग्रस्त भागातील (----------विद्यार्थी संख्या) व (----------रक्कम ) एवढी आहे.

सही/-

विभागीय सहसंचालक